कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत प्रकल्प/योजनांचे वित्तीय मान्यता तसेच पर्यवेक्षण व संनियंत्रणासाठी राज्य स्तरावर “प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB)” स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१९/प्र.क्र.९४/अभियान-१,
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ जुलै, २०२०

**प्रस्तावना :**

कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत कौशल्य विकास तथा उद्योजकतेसंबंधी केंद्र/राज्य शासन पुरस्कृत विविध योजना राबविण्यांत येतात. योजनांचा उद्देश मुख्यत्वे कौशल्यातून रोजगार व कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणे व रोजगार/स्वयंरोजगारांशी संबंधित यंत्रणांमध्ये आवश्यक समन्वय करणे असा आहे. सदर योजना राबविताना योजनांची द्विरुक्ती होणे, उद्योजकांशी समन्वयाचा अभाव तसेच निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य न होणे इत्यादी बाबी टाळणे आवश्यक असते. पर्यवेक्षण व सनियंत्रण हा सुप्रशासनाचा पाया मानला जातो. कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत कार्यरत विविध संस्थांमध्ये व क्षेत्रीय कार्यालयातील आर्थिक बाबींमध्ये सुसूत्रता आणण्याच्या हेतूने त्यास अनुसरुन कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांचे, योजनांचे वित्तीय मान्यता तसेच पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याकरिता राज्य स्तरावर “प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB)” स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या सर्व प्रकल्पांचे, योजनांचे वित्तीय मान्यता तसेच पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याकरिता राज्य स्तरावर “प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB)” स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई | : | अध्यक्ष |
| २) | मा.अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई | : | सदस्य |
| ३) | आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई | : | सदस्य |
| ४) | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई | : | सदस्य |
| ६) | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई | : | सदस्य |
| ७) | व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या., मुंबई | : | सदस्य |
| ८) | उपसंचालक, कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई | : | सदस्य |
| ९) | कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे सर्व सह सचिव/उप सचिव, मंत्रालय, मुंबई | : | सदस्य |
| १०) | संबंधित विषयाचे सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई | : | सदस्य सचिव |

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाव्यतिरिक्त इतर विभागातील सचिवांना निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करण्याचे अधिकार प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB) यांना असतील.

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत कार्यरत असलेल्या आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परिक्षा मंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी या कार्यालयांकडून राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत, केंद्र : राज्य पुरस्कृत व राज्य शासन पुरस्कृत योजना/ प्रकल्प/ कार्यक्रम यांवर प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB)" यांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण राहील. तसेच संबंधित क्षेत्रीय कार्यालय / संस्था यांनी उपरोक्त केंद्र व राज्य योजना/प्रकल्प/कार्यक्रम यांना वित्तीय मान्यता देताना प्रकल्प मान्यता मंडळ (Project Approval Board-PAB)" यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

**३. प्रकल्प मान्यता मंडळाची (Project Approval Board-PAB) कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:-**

१) केंद्र, केंद्र : राज्य पुरस्कृत व राज्य शासन पुरस्कृत योजनांचे प्रस्ताव/कार्यक्रम/विशेष प्रकल्प यासंदर्भातील प्रस्ताव/आराखडा शासनास सादर करण्यापूर्वी त्यांस मान्यता देणे.

२) केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर योजना/कार्यक्रम/विशेष प्रकल्प तसेच राज्य शासनाच्या योजना/कार्यक्रम/प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचा आराखडा निश्चित करुन त्यांस मान्यता देणे.

३) केंद्र, केंद्र-राज्य पुरस्कृत मान्यता देण्यात आलेल्या योजना/कार्यक्रम/प्रकल्प तसेच राज्यशासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर पर्यवेक्षण व सनियंत्रण ठेवणे.

४) केंद्र पुरस्कृत, केंद्र-राज्य पुरस्कृत तसेच राज्य शासनाच्या योजना/ कार्यक्रम/ प्रकल्प/ याकरिता मान्य निधीच्या विनियोगाचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे.

५) केंद्र पुरस्कृत, केंद्र-राज्य पुरस्कृत, राज्य शासनाच्या योजना/प्रकल्प/कार्यक्रम तसेच स्टार्टअप, इन्क्युबेटर, बांधकाम, निविदा आदि रुपये ५ लाख ते रुपये १५ कोटी पर्यंतच्या प्रस्तावांना मंजूरी देणे.

६) केंद्र, केंद्र-राज्य पुरस्कृत तसेच राज्य शासनाच्या योजना/प्रकल्प/कार्यक्रम यांच्याशी संबंधित डेटा विश्लेषण करुन उद्दिष्टपूर्ती/साध्य याबाबतचा आढावा घेणे.

७) केंद्र पुरस्कृत, केंद्र-राज्य पुरस्कृत तसेच राज्य शासनाच्या योजना/कार्यक्रम/प्रकल्प यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) अंतर्गत येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता राज्य प्रकल्प मंडळाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेंअंतर्गत असलेल्या समितींचे वित्तीय अधिकार शासन निर्णय दिनांक १६, मार्च, २०२० मधील तरतूदींप्रमाणे राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२००७१३१३०५५८०४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2020.07.13 15:15:54 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सह सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६) सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, यांचे वरिष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
१३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई.
१५) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, मुंबई.
१६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई.
१७) सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती (अभियान-१).